**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती विशेष सभा क्रमांक :- १८**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :- ८/०३/२०१३

प्रति,
मा. --------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील अनुसुची "ड"प्रकरण २ नियम ३(क) अन्वये अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची **विशेष सभा क्र.१८सोमवार दि. ११/०३/२०१३ रोजी दुपारी १.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र.नगरसचिव,
मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये
अहमदनगर महानगरपालिका.

**सोमवार दिनांक- ११/०३/२०१३ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ८९ | अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीतील रस्ता बाजु मांडणी फी वसुली खाजगी तत्वावर निविदा पध्दतीने निविदेतील अटी व शर्तीनुसार देणेकामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |

सही /-
प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

सोबत- विषय क्रमांक- ८९ च्या प्रस्तावाच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती  विशेष सभा क्रमांक-१८**

विषय क्रमांक-८९ सोमवार दि. ११/०३/२०१३

ठराव क्रमांक- ८९ सोमवार दि.११/०३/२०१३

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीतील रस्ता बाजु मांडणी फी वसुली खाजगी तत्वावर निविदा पध्दतीने निविदेतील  अटी व शर्तीनुसार देणेकामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. मार्केट विभाग जा.क्र. २६३ दि.०२/०३/२०१३

सादर,

विनंती रिपोर्ट की, रस्ता बाजू मांडणी फी ई - निविदा क्र.५२३ दिनांक ६/२/२०१३ अन्वये जाहिरात क्र. १ दैनिक सामना व दैनिक नगर टाइरम्स या दोन वर्तमानपत्रामध्ये (रोटेशन पध्दतीने) प्रसिध्द करण्यांत आली आहे. सदर निविदेची अंतिम मुदत दि.२८/०२/२०१३ अखेर होती. मुदतीमध्ये खालील ३ निविदा प्राप्त झाल्या आहेत.

०१. श्री. साई पेस्ट कंट्रोल

०२. ओम साई एंटरप्रायजेस

०३.  मे. एक्झीम पेस्ट कंट्रोल

प्राप्त झालेल्या निविदेची तांत्रिक लिफाफ्यामधील आवश्यक कागदपत्राचा तक्ता खालीलप्रमाणे

| अ नं | तांत्रिक लिफाफ्या मधील आवश्यक कागदपत्रे | श्री साई पेस्ट कंट्रोल | ओम साई एंटरप्राईजेस | एक्झीम पेस्ट कंट्रोल |
|---|---|---|---|---|
| १. | निविदाधारकास किमान १ वर्षाचा रस्ता बाजू मांडणी फी वसुलीचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल. त्याबाबत अनुभवाचे कागदपत्र सोबत जोडावेत | रस्ता बाजु फी वसुली बाबतचे प्रमाणपत्र जोडले आहे. | टोल नाका वसुलीचा अनुभव असलेले प्रमाणपत्र जोडले आहे. | नाही |
| २. | मागील ३ वर्षाचे लेखा विवरण पत्राच्या प्रती जोडाव्यात. | आहे | आहे | आहे |
| ३. | पॅन कार्डाची स्वाक्षांकित प्रत जोडावी. | आहे | आहे | आहे |
| ४. | बयाणा रक्कम भरली | आहे | आहे | आहे |

वरील प्रमाणे तांत्रिक लिफाफे ग्राहय असल्याने सदरच्या तिनही निविदेचे व्यापारी लिफाफे उघडण्यांबाबत मा.छाननी समितीने मान्यता दिलेली आहे.

आज दिनांक २/३/२०१३ रोजी सकाळी ११.०० वा. छाननी समिती समोर तसेच निविदा भरलेल्या एजन्सी व प्रतिनिधी यांच्या समक्ष व्यापारी लिफाफे उघडण्यांत आलेले आहेत.

त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | देकार रक्कम |
|---|---|---|
| **१** | **मे. एक्झीम पेस्ट कंट्रोल** | **३५,२१,००१/-** |
| २ | ओम साई एंटरप्रायजेस | ३४,२०,०००/- |
| ३ | श्री साई पेस्ट कंट्रोल | २८,००,००१/- |

तरी सदर तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे अनुक्रमांक १मे.एक्झीम पेस्ट कंट्रोल यांची देकार किंमत रूपये ३५,२१,००१/-(अक्षरी रूपये पस्तीस लाख एकवीस हजार एक मात्र) ही सर्वात जास्त देकार रक्कमेची निविदा प्राप्त झालेली असुन या रक्कमेचा प्रस्ताव निविदेतील अटी शर्ती नुसार सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे निर्णयास्तव घेण्यासाठी मा.आयुक्त साहेब यांनी मान्यता दिलेली आहे.

तरी सदरचा प्रस्ताव निर्णयास्तव मा.स्थायी समिती पुढे घेण्यांबाबत आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे मार्केट विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- रस्ता बाजु मांडणी फी वसुली खाजगी तत्वावर निविदा पध्दतीने निविदेतील अटी व शर्तीनुसार देणे विषयी प्रस्ताव आहे. ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब **व** मा.श्री. डागवाले कि.आ. :- अटी व शर्तींचे वाचन करा.

श्री. माने लिपिक मार्केट विभाग यांनी अटी व शर्तीचे वाचन सुरू केले.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- पहिली अट काय आहे.

श्री.माने,मार्केट विभाग लिपीक यांनी १ली अट पुन्हा वाचली व पुढील अटी वाचणे सुरू केले.

मा.सभापती साहेब :- अट क्र.७ पुन्हा वाचा.

श्री.माने,मार्केट विभाग लिपीक यांनी ७वी अट पुन्हा वाचली व पुढील अटी वाचणे पुर्ण केले.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- छाननी झाली का?

मार्केट वि. प्रमुख श्री. दिवाण :- आलेले निविदा २ तारखेला छाननी समिती समोर उघडण्यात आल्या. त्यांची सर्व कागदपत्रे बरोबर आहेत.त्यांची छाननी समिती समोर तपासणी करण्यांत आली.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- छाननी समिती कोण कोण आहेत.

मुख्य लेखा परीक्षक श्री.मेश्राम :-मा.उपायुक्त,लेखा व वित्त अधिकारी, मुख्य लेखा परीक्षक, विभाग प्रमुख हे असतात.

मा.श्री.भोसले ग.पुं.:- हे कोणत्या कायदयात आहे

मा.उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे :- मा.आयुक्त यांनी छाननी समितीची निवड केली.,

मा.श्री. डागवाले कि.आ. :- कोणता कायदा आहे. ते तर ठरावाने केले आहे.

मा.उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे :- आयुक्त आदेश काढू शकतात.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- निगोशिएशन झाले का.

मा.उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे :- फक्त छाननी झाली निगोशिएशन झालेल नाही. कारण रक्कम जास्त आली आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- कोणाच्या निविदा आल्या व त्यांच्या रकमा किती आहेत.

मार्केट वि. प्रमुख श्री. दिवाण :- १] श्री. साई पेस्ट कंट्रोल- रू.२८०००0१/-, २] ओम साई एटंरप्राइजेस- रू.३४२००००, ३] मे. एक्झीम पेस्ट कंट्रोल- रू.३५२१००१/-

मा.श्री. डागवाले कि.आ. :- मे. एक्झीम पेस्ट कंट्रोल आपल्या अटी व शर्तीनुसार सगळे बरोबर आहे का ?

मार्केट वि.प्रमुख श्री. दिवाण :- त्याला रस्ता फी वसुलीचा अनुभव नाही..

मा.श्री. डागवाले कि.आ. :- याला अनुभव नाही. याला समक्ष बोलवा. तुमची पहिलीच अट अशी आहे की त्याला एक वर्षाचा अनुभव पाहिजे.

मार्केट वि. प्रमुख श्री. दिवाण :- अनुभव नाही.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- ज्याचा दर सर्वाधिक आहे त्याला समक्ष बोलवा. पारगमनच्या वेळेस सुध्दा सांगितल होते तो एक वर्षाच्या अनुभवात बसत नाही त्याला फोन करून बोलवा.

मार्केट वि.प्रमुख श्री. दिवाण :- त्याला फोन केला होता. ते नाशिकला आहे. तो येउ शकत नाही.त्यांचे प्रतिनिधी येतील.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- मागच्या वेळेस सांगीतले होते की सभेस संबंधीत निविदाकारांना बोलवा.

मा.उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे :- नगरसचिव सांगा, बोलावले होते का.

प्र.नगरसचिव श्री.मिलींद वैद्य :- संबंधीताना बोलवण्याचे काम टेंडर मागविणा-या संबंधीत विभागाचे आहे. त्यांना अजेंडा प्राप्त झाल्यावर त्यांनी बोलावण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

मा.सौ. खरमाळे सं.र. :- दोन नंबर वाल्याला ओम साई एंटरप्राइयजेस फोन करून बोलवा.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- जर दोन क्रमांकावरील रक्कम भरलेला जास्त रक्कम भरण्यास तयार असेल तर त्याला बोलावता येईल का.

मुख्य लेखा परिक्षक श्री. मेश्राम :-आपण ई- निविदा मागविलेली आहे. त्यामुळे जास्तीचे ई-निविदादर धारक यांची निविदा मंजुर करायला पाहिजे.

मा.उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे :- जर दुस-याला जास्त रक्कम भरावयाची असती तर ती टेंडर मध्ये च भरली असती.

मा.श्री.भोसले ग.पुं.:- मे.एक्झीम एंटरप्रायजेसला अनुभव नाही. जर ओम साई एंटरप्रायजेस जास्त पैसे दयायला तयार असेल तर ठराव करून त्याला मंजूरी दया.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- मागील ठेकेदाराची मुदत केंव्हा संपते.

मार्केट वि. प्रमुख श्री. दिवाण :- पहिल्या ठेकेदाराची मुदत उदया दि.१२/०३/२०१३ रोजी संपते

श्री मेश्राम,मुख्य लेखापरीक्षकः- परीणाम काय होईल ते सांगा.

मार्केट वि. प्रमुख श्री. दिवाण :- आपल्या कर्मचा-यांमार्फ केली तर वसुली फार कमी होईल. १० ते २०% वसुली होईल.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- बिगर अनुभवी माणसाला कसे देणार .आणि मुदत जर दि.१२/०३/२०१३ ला संपली आणि कर्मचा-यांमार्फत वसुली करायची वेळ आली. तर तुम्ही काय करणार.तुम्ही विभागाने वसूली करण्याची तयारी ठेवणे आवश्यक आहे. याकरीता मुदत संपण्यापुर्वी किमान एक महिना अगोदर प्रस्ताव पाठविणे आवश्यक होते. निविदा धारकांना बोलावा.

मार्केट वि. प्रमुख श्री. दिवाण :- त्यांना बोलवतो.

मा.श्री.भोसले ग.पुं.**व** मा.श्री.डागवाले कि.आ.:-अर्धा तास तहकुब करावी व दोन वाजता परत सभा बोलवा.

मा.सभापती साहेब :- अर्ध्या तासाने सभा सुरू करण्यांत येईल.

एक्झीम पेस्ट कंट्रोल यांचे प्रतिनिधी ॲड. कैलास रघुनाथ कोतकर व ओम साई यांचे प्रतिनिधी म्हणून श्री. अनिल लालवाणी हे सभेमध्ये उपस्थित झाले. त्यानंतर निगोसिएशन करण्यांत आले

ओम साई एंटरप्रायजेस यांनी मा.सभापती यांचेकडेस लेखी पत्र सादर केले.

मा.सभापती साहेब :- ओम साई एंटरप्रायजेस यांनी सदरची निविदा दर रक्कम रू. ३६ लाख इतक्या रकमेस घेण्यास तयार असल्याने विचारात घेण्यात यावी बाबत पत्र दिले.

मा.श्री.डागवाले कि.आ. :- एक्झीम पेस्ट कंट्रोल यांचे निविदा दरापेक्षा ही रक्कम जास्त आहे. त्यामुळे महानगरपालिकेचा आर्थिक फायदा होणार आहे. एक्झीमाचे प्रतिनिधीनी याबाबत सांगावे

मे. एक्झीम पेस्ट कंट्रोल प्रतिनिधी ॲड. कोतकर :- ओम साई एंटरप्रायजेस यांनी दिलेली निविदा रक्कम ही जास्त आहे. त्यामुळे महानगरपालिकेचा फायदा होणार असेल तर आमची हरकत नाही. त्यांना ठेका देण्यात यावा.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- मागची निविदा कशी दिली होती.

मार्केट विभाग श्री. माने लिपिक :- मागची निविदा काढली तेव्हा तीन टेंडर आले होते. साई पेस्ट कंट्रोल यांनी १८ लाख ११ हजार भरले होते. आपली मागणी २५ लाखाची होती. तीन निविदा होत्या.

| | | |
|---|---|---|
| १ | एक्सिम पेस्ट कंट्रोल | १३७५००० |
| २ | श्री. साई पेस्ट कंट्रोल | १८११००० |
| ३ | वैष्णवी कंपनी | १२५१००० |

मा.श्री. डागवाले कि.आ. :- मागील वेळेस कसे दिले होते.

मार्केट विभाग श्री.माने- लिपीक :- प्रशासकीय निगोसिएशन करून पत्र घेउन यानंतर स्थायी समितीस प्रस्ताव सादर करण्यात आला. त्यानुसार स्थायी समितीमध्ये ठराव करून दिले होते.

मा.उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे :- जो हायेस्ट होता त्याच्याकडून रक्कम वाढवून घेतली होती.

मा.श्री.भोसले ग.पुं.:-एक्झीम पेस्ट कंट्रोल वसुलीचा अनुभव नाही.ओम साईला वसुलीचा अनुभव आहे.

मा.सभापती साहेब :- टेंडर कधी काढले.

मार्केट वि. प्रमुख श्री. दिवाण :- ६/२ /१३ ला टेंडर काढले.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- टेंडर तीन महिने पुर्वी प्रसिध्द करायाच पाहिजे. मुदत संपण्यास दोन दिवस असतांना कसे काय स्थायी समिती समोर ठेवता.

मा.सभापती साहेब :- हया सगळया प्रोसेसला का उशीर होतो. तीन निविदा आल्या नसल्या तर फेरनिविदा काढावी लागली असती यात बरेच दिवस गेले असते. करारनामा वेळेत पुर्णं न झाल्यास होणा-या आर्थिक नुकसनीस कोण जबाबदार

मा.सौ. खरमाळे सं.र. :- एक लाख रक्कम उत्पन्न जास्त येत असल्याने त्यांना ठेका दयावा .

प्र.उपायुक्त (कर) श्री. एस.एस. परशरामी :- नविन निविदा धारकास कार्यारंभ आदेश देईपर्यंत पुर्वीच्या ठेकेदारास १०% वाढीव रकम घेवून मुदतवाढ दयावी.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- ओम साई एंटरप्रायजेस यांना नियमानुसार ठेका देता येत असल्यास दयावा. अन्यथा जादा निविदा दर धारक एक्झीम पेस्ट कंट्रोल यांची निविदा दर मंजुर करण्यात यावी. तसेच यापुढे निविदा धारकांना निगोशिएशनकरीता स्थायी समितीत बोलविण्यांत यावे व निविदा प्रक्रियापुर्णं होईपर्यत पुर्वीच्या ठेकेदारास मुदतवाढ देण्यात यावी.

मा.सौ. खरमाळे सं.र :- मे. एक्झीम पेस्ट कंट्रोल यांचा ठेका मंजूर करण्यांत यावा परंतु ओम साई एंटरप्रायेजस यांना कायदेशीर बाबी पाहून महानगरपालिकेच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने ठेका देणेबाबत आपल्या स्तरावर निर्णय घ्यावा.

मा.सभापती साहेब :- मे.ओम साई एंटरप्रायजेस ३६ लाखाला घ्यायला तयार आहे. तसेच टोल नाक्याचा अनुभव असल्याने कायदेशीर बाबी तपासून नियमानुसार देता येत असल्यास दयावा. अन्यथा मे.एक्झीम पेस्ट कंट्रोल यांची निविदेस सर्वानुमते मंजुरी दयावी. तसेच यापुढे निविदा धारकांना निगोशिएशनकरीता स्थायी समितीत उपस्थित ठेवणेबाबत कार्यवाही करण्यात यावी.निविदा धारकास वर्क ऑर्डर देण्याच्या कालावधीमध्ये पुर्वीच्या ठेकेदारास १०% वाढीव रक्कम घेवून मुदतवाढ देण्यांत यावी. सदरची कार्यवाही तात्काळ करण्यांत यावी.

<u>**ठराव :-**</u> अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीतील रस्ता बाजू मांडणी फी वसुली खाजगी तत्वावर निविदा पध्दतीने मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्टानुसार सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार पुढील निर्णय घेण्यात येत आहे.

पुर्वीच्या निविदा धारकाची मुदत दिनांक १२/०३/२०१३ रोजी संपत असल्याने नविन निविदा धारकास कार्यारंभ आदेश देईपावेतो श्री साई पेस्ट कंट्रोल यांना पुर्वीच्या निविदा दरामध्ये १०% वाढीव रकमेनुसार मुदतवाढ देण्यांत येत आहे. यापुर्वी रस्ता बाजू मांडणी फी वसुली खाजगी तत्वावर निविदा पध्दतीने देतांना निगोशिएशन अंती वाढीव रकमेस दिलेली आहे. यावेळेस सदर निविदा प्रक्रिया पार पाडतांना छाननी समितीने कोणत्याही वाटाघाटी केल्याचे दिसत नाही. तसेच निविदा अटी व शर्ती नुसार अट क्र.१ नुसार मे. एक्झीम पेस्ट कंट्रोल यांना वसुलीचा अनुभव नाही. या बाबी विचारात घेणे गरजेचे आहे.

जेणे करून महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होणार नाही. त्यानुसार मे. ओम साई एंटरप्रायजेस यांनी दिलेल्या लेखी पत्रानुसार निविदा देकार रक्कम रूपये ३६,००,०००/- (रूपये छत्तीस लाख मात्र) देण्यास तयार असल्याने महानगरपालिकेचा आर्थिक फायदा विचारात घेता नियमानुसार देता येत असल्यास अन्यथा मे. एक्झीम पेस्ट कंट्रोल यांनी दिलेल्या निविदा दर रक्कम रूपये ३५,२१,००१/- (रूपये पस्तीस लाख एकवीस हजार एक मात्र ) चे दरास निविदेतील अटी व शर्तीनुसार मंजुरी देण्यांत येत आहे. सदरची कार्यवाही तात्काळ करण्यांत यावी.

मात्र यापुढे मा.स्थायी समिती समोर निविदा प्रस्ताव सादर करतांना मुदतीपुर्वी किमान एक महिना अगोदर तसेच निविदा धारकांना वाटाघाटी (निगोशिएशन) करीता उपस्थित ठेवणेबाबतचे आदेश पारित करावेत.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. डागवाले किशोर आसाराम सही /-

अनुमोदक :- मा.सौ.खरमाळे संगीता रत्नाकर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-

सभापती,

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका